# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम.

कार्यालय दुरध्वनी क्र.07252 234834

ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in

Website:www.washimpolice.gov.in


जा.क्र :-पोअवा/वाचक/51/ परीपत्रक/सणउत्सव/ 2702 /2022, वाशिम दि. 10/10/2022.

संदर्भ :- 1 पोमसं/20/195/परीपत्रक/सणउत्सव/01/2022 मुंबई दि.28.09.2022

2. पोअवा/वाचक/51/परीपत्रक/वर्तन/2608/2022 वाशिम दि.29.09.2022

विषय :- पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी भारतीय संविधान,महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे व कर्तव्यावर अथवा गणवेशामध्ये असतांना योग्य वर्तन ठेवणेबाबत...........

0——00——0

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मध्ये शासकीय अधिकारी/कर्मचा-यांनी त्यांच्या व्यावसायीक आणि वैयक्तीकरित्या कसे कामकाज करावे हे निर्दीष्ट केले आहे.या नियमांनुसार शासकीय सेवक त्यांच्या सार्वजनिक कर्तव्याशी संबंधीत कोणतेही खाजगी हित घोषीत करतील आणि कोणताही विरोध असल्यास,सार्वजनिक हित जपले जाईल अशा रितीने तो मिटविण्यासाठी उपाय योजतील (नियम 3 (1)(xii),शासकीय सेवक हे औचित्यपुर्व आणि निःपक्षपातीपणे काम करतील आणि कोणाशीही विशेषतः समाजातील गरीब आणि वंचीत घटकांशी भेदभाव करणार नाहीत (नियम 3 (1)(xvii)),त्याचप्रमाणे जे कोणत्याही कायदयाच्या,नियमांच्या,विनियमांच्या आणि प्रस्थापित प्रथेच्या विरुध्द आहे किंवा असु शकते असे कोणतेही कृत्य करण्यापासुन दुर राहतील (नियम 3 (1)(xviii))या सोबतच या नियमांनुसार शासकीय सेवकांना भारतीय संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मुल्ये यांच्या प्रती वचनबध्द राहणे बंधनकारक आहे (नियम 3 (1)(iv)) आणि जनतेशी सौजन्य व चांगले वर्तन राखणे आवश्यक आहे (नियम 3 (1)(xi))

वर्तणुक नियमांचा एकंदरीत अर्थ असा आहे कि,शासकीय सेवकांनी कर्तव्याचे पालन करतांना उच्च दर्जाचा निःपक्षपातीपणा राखणे आवश्यक आहे तसेच त्यांनी पक्षपातीपणा आणि पुर्वग्रह यांचा त्याग केला पाहीजे,जेणेकरुन त्यांची कर्तव्ये तटस्थपणे आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेची तडजोड होणार नाही.

पोलीस खाते हे शिस्तप्रिय खाते असुन पोलीस खात्याकडुन कायदयाची अंमलबजावणी करणे,गुन्हयांना आळा घालुन गुन्हेगारांविरुध्द कायदेशिर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांवर कायदेशिर कारवाईचा धाक असणे अपेक्षीत आहे.पोलीस गणवेश कायदेशिर कर्तव्याकरीता परीधान केला जात असल्याने,त्याचा आदर ठेवुन त्या अनुषंगाने केल्या जाणा-या कर्तव्याचा सर्वांना आदरपुर्वक अभिमान असणे गरजेचे आहे.

तरी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी सदर परीपत्रकाचे अनुषंगाने आपले पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दरबार घेवुन त्यांना खालील नमुद प्रमाणे सुचना दयाव्यात.

1. कोणत्याही मिरवणुकी दरम्यान कर्तव्यावर हजर असतांना कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करु नये.(कामरगाव पोलीस स्टेशन धनज येथे घडलेल्या घटनेबाबत)
2. पोलीस स्टेशन मानोरा येथील वाहतुक अंमलदारांनी जनतेशी केलेल्या गैरवर्तनुकीबाबत
3. बंदोबस्तामध्ये कर्तव्यावर हजर असतांना अनावश्यक वायफळ बडबडीबाबत
4. शासकीय कामे करुन देण्याकरीता लाचेची मागणी न करण्याबाबत

तरी पोलीस खाते हे शिस्तप्रिय खाते असल्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दरबार घेवुन त्यांना नमुद पत्रकातील तसेच आम्ही दिलेल्या सुचनाबाबत अवगत करुन त्याबाबत पोलीस स्टेशनचे अभिलेखावर नोंद घेण्यात यावी.

[ बच्चन सिंह ]
**पोलीस अधिक्षक, वाशिम.**

**प्रति,**

**1.सर्व ठाणेदार वाशिम जिल्हा.**

**2.सर्व शाखा प्रमुख वाशिम.**

**प्रत,**

**1.अपर पोलीस अधीक्षक वाशिम**

**2.उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम,मंगरुळपीर व कारंजा.**